# <u>प्रेसनोट</u>

दि. १३/०६/२०२३

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस अंमलदारांवर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३९८/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) जयराम नारायण सावळकर, पोलीस हवालदार,<br>२) विनायक मुधोळकर, पोलीस हवालदार,<br>३) राजेंद्र रामकृष्ण दीक्षित, वय ५७ वर्ष, पोलीस हवालदार<br>सर्व नेमणूक : येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १३,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | १२/०६/२०२३ |
| सापळा दिनांक | १३/०६/२०२३ |

ठिकाण :- येरवडा पोलीस स्टेशनचे आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असून तक्रारदार यांच्या कारला झालेल्या अपघाताची तक्रार दाखल करण्यासाठी येरवडा पोलीस ठाण्याचे लोकसेवक पोलीस हवालदार सावळकर यांनी २०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक पोलीस हवालदार सावळकर यानी तक्रारदार यांचेकडे सुरवातीस २०,०००/- रुपयांची (वीस हजार रुपये) मागणी करून, तडजोडीअंती १३,०००/- रुपयांची मागणी केली, त्यानंतर पोलीस हवालदार विनायम मुधोळकर यांनी सुद्धा तक्रारदारांकडे १३,०००/- रुपयांची लाच मागणी केली, मुधोळकर यांचेवतीने लोकसेवक पोलीस हवालदार राजेंद्र दीक्षित यानी १३,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यावर दीक्षित यांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले. त्या तिघांविरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये लोकसेवक पोलीस हवालदार राजेंद्र दीक्षित याना अटक करून आज दि.१३/६/२०२३ रोजी मा. विशेष न्यायालय, पुणे येथे हजर केले असता, मा. न्यायालयाने दि. १६/०६/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक भारत साळुंखे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.